पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताह

## व्याख्याने, कवी संमेलन, माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात सोमवार (दि. १०) 'फुले-शाहू-आंबेडकर' सप्ताहास प्रारंभ होणार आहे. सप्ताहांतर्गत मान्यवरांची व्याख्याने, कवी संमेलन, माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे.

फुले-शाहू-आंबेडकर सप्ताहाचे उद्घाटन पुणे येथील वसंतदादा इन्स्टिट्यूटचे संचालक शिवाजीराव देशमुख यांच्या हस्ते होणार आहे. कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत. प्र-कुलगुरू प्रा. डॉ. पी. एस. पाटील, प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. सप्ताहाच्या पहिल्या दिवशी पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त 'भारतातील शेतीच्या समस्या' या विषयावर परिसंवाद होणार आहे.

महात्मा जोतिराव फुले यांच्या जयंती निमित्ताने 'फुले आंबेडकरांची



भारतविषयक संकल्पना' या विषयावर मंगळवारी परिसंवाद होणार आहे. बुधवारी (दि. १२) रोजी कवी संमेलन होणार आहे. गुरुवारी (दि. १३) सकाळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र येथे वक्तृत्व स्पर्धा होतील. शुक्रवारी (दि. १४) राजर्षी शाहू सभागृह सिनेट हॉल येथे डॉ. रमेश कांबळे, मुंबई विद्यापीठ, मुंबई यांचे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सार्वजनिक चिकित्सक अवकाश' या विषयावर व्याख्यान होईल. शनिवारी (दि. १५) मानव्यशास्त्र सभागृहामध्ये आजी माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विद्यापीठातर्फे करण्यात आले आहे.

10 APR 2023

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे सर्व आर्थिक व्यवहार 'ऑनलाईन'

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या वित्त व लेखा विभागांतर्गत कार्यरत जमास्वीकृती कक्षाच्या इतिहासात बुधवारचा दिवस महत्त्वाचा ठरला. विद्यापीठाच्या इतिहासात जमास्वीकृती कक्षामध्ये सर्व व्यवहार शंभर टक्के ऑनलाईन झाले. एकही व्यवहार रोखीने झाला नाही.

प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली वित्त व लेखा विभागाने विद्यार्थ्यांसह विविध घटकांच्या सोयीसाठी ऑनलाईन रिसीट पोर्टलची निर्मिती केली. त्या अनुषंगाने अधिकार मंडळाच्या ठरावानुसार विद्यापीठ परिसरातील सर्व अधिविभागांद्वारे विद्यापीठाच्या जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे तसेच बँक पावतीद्वारा केल्या जाणाऱ्या पावत्या ३१ डिसेंबर २०२२ पासून बंद करण्यात आल्या.

३१ जानेवारीपासून महाविद्यालये व इतर घटकांसाठी ही सुविधा बंद करण्यात आली. सर्व संबंधितांना ऑनलाईन रिसिट पोर्टलचा वापर करून सर्व व्यवहार, पावत्या ऑनलाईन करण्याच्या सूचना देण्यात आल्या. ५ एप्रिल रोजीचे सर्व व्यवहार, पावत्या ऑनलाईन स्वरुपात झाले. विद्यापीठाशी संबंधित कोणताही आर्थिक व्यवहार प्रत्येक विद्यार्थी कोणत्याही ठिकाणाहून संगणक अथवा मोबाईलवरुन ऑनलाईन स्वरुपात करू शकणार आहेत. तथापि, विद्यापीठात येऊन व्यवहार करू इच्छिणाऱ्यांसाठी जमास्वीकृती विभागात पाच संगणक उपलब्ध आहेत.

वित्त व लेखा विभागातील जमास्वीकृतीचे शंभर टक्के व्यवहार ऑनलाईन करण्याची कामगिरी यशस्वी करणाऱ्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ.पी.एस. पाटील यांनी विभागात जाऊन अभिनंदन केले.

यावेळी प्रभारी कुलसचिव डॉ. विलास शिंदे, वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख उपस्थित होते.

पुढारी

# पत्रकारिता जनसंवाद विभागातर्फे विद्यापीठात आजपासून कार्यशाळा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ पत्रकारिता व जनसंवाद अधिविभागाच्या वतीने दि. १० व ११ एप्रिल रोजी 'ऐतिहासिक माहितीपट निर्मिती : राजर्षी छत्रपती शाहू महाराज विशेष संदर्भ' या विषयावर दोन दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यशाळेंतर्गत सोमवारी पुराभिलेख अधिकारी गणेशकुमार खोडके 'समाजाच्या सर्वांगीण विकासाची दूरदृष्टी असणारा राजा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज', दै. 'पुढारी' प्रयोग सोशल फऊंडेशनचे विक्रम रेपे 'ऐतिहासिक माहितीपट निर्मिती : राजर्षी छत्रपती शाहू महाराज विशेष संदर्भ' या विषयावर मार्गदर्शन करतील. दि. ११ रोजी 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज : संदर्भ साहित्य' विषयावर डॉ. निलांबरी जगताप; जिल्हा माहिती अधिकारी वृषाली पाटील 'राजर्षी शाहू महाराज स्मृती शताब्दी वर्षानिमित्त आयोजित कार्यक्रम रूपरेषा' विषयावर विचार मांडतील. कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

पुढारी

# पत्रकारांनी लोकहिताला प्राधान्य द्यावे : भावसार

## पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे ऑनलाईन व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बदलत्या परिस्थितीमध्ये पत्रकारिता करताना केवळ माहिती मिळवून चालणार नाही, तर त्या माहितीवर प्रक्रिया करावी लागते. त्यातूनच चांगल्या बातम्या वाचकांपर्यंत पोहोचवणे शक्य आहे. मात्र, हे करताना पत्रकारांनी लोकहिताला प्राधान्य दिले पाहिजे, असे मत ज्येष्ठ पत्रकार विवेक भावसार यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनातर्फे भावसार यांचे ऑनलाईन व्याख्यानप्रसंगी ते बोलत होते. भावसार म्हणाले, पत्रकारांनी माहितीसोबत डेटा संकलनावर भर दिला पाहिजे. डेटावर प्रक्रिया करून त्यातून वेगळी बातमी वाचकांपर्यंत पोहोचवली पाहिजे. एकसारख्या पारंपरिक बातम्या देणे स्पर्धेच्या युगामध्ये संयुक्तिक ठरणार नाही. वाचकांची आवड बदलली असून, त्यानुसार वार्तांकन आवश्यक आहे.

पत्रकारांनी तटस्थ वार्तांकन केले पाहिजे, असे सांगून ते म्हणाले, पत्रकार नेहमी लोकांच्या बाजूने असतो. समाजाचे विविध प्रश्न तो शासन दरबारी मांडतो. ग्रामीण भागात अनेक प्रश्न, आव्हाने आहेत. त्याची दखल पत्रकारांनी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. अभिजित गुर्जर यांनी पाहुण्यांची ओळख करून दिली.

10 APR 2023
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



# प्रवेश परीक्षेतील गुणांवरच 'ॲडमिशन'

## यंदापासून शिवाजी विद्यापीठाकडून प्रक्रियेत बदल; विविध अभ्यासक्रमांचा समावेश

▸ **संतोष मिठारी : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ९ : विविध २६ अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी शिवाजी विद्यापीठाकडून प्रवेश परीक्षा (इंट्रन्स एक्झाम) घेतली जाते. या परीक्षेतील गुणांवरच या वर्षीपासून विद्यार्थ्यांचे प्रवेश (ॲडमिशन) निश्चित करण्याचा निर्णय विद्यापीठाच्या पी. जी. ॲडमिशन (पदव्युत्तर पदवी प्रवेश) विभागाने घेतला. त्यानुसार ५ ते ११ मे दरम्यान प्रवेश परीक्षा होणार आहेत.

पदवी अभ्यासक्रमाचे ५० टक्के गुण आणि प्रवेश परीक्षेतील गुणांची टक्केवारी एकत्रित करून प्रवेशासाठी विद्यार्थ्यांची गुणवत्ता यादी जाहीर करण्यात येत होती. काही अभ्यासक्रमांमध्ये मुलाखतीचे गुणही होते. त्यानुसार प्रवेश प्रक्रिया पूर्ण केली जात होती. मात्र, प्रवेश परीक्षेचे गुण प्राप्त व्हायचे आणि पदवी अभ्यासक्रमाचा निकाल काही कारणांनी लांबणीवर पडायचा. त्यामुळे प्रवेश प्रक्रियेला विलंब होऊन विद्यार्थी अन्य विद्यापीठ, शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेशित व्हायचे. ते

> पदवी अभ्यासक्रमाच्या निकालांच्या विलंबाचा प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होऊ नये. अन्य विद्यापीठांनुसार शिवाजी विद्यापीठातील प्रक्रियेचे स्वरूप रहावे यासाठी प्रवेश परीक्षेतील गुणांवर प्रवेश देण्याचा निर्णय अधिकार मंडळाच्या मान्यतेनुसार घेतला आहे. त्याची अंमलबजावणी या वर्षीपासून होईल. फॅक्टली चेंज परीक्षा गेल्यावर्षी रद्द केली आहे.
>
> **-डॉ. एस. एस. महाजन,**
> अध्यक्ष, केंद्रीय प्रवेश प्रक्रिया समिती शिवाजी विद्यापीठ

लक्षात घेऊन या वर्षीपासून केवळ प्रवेश परीक्षेच्या गुणांवर ॲडमिशन होणार आहेत. त्यासाठी संबंधित विद्यार्थ्यांची आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्ण असणे आवश्यक आहे. या नव्या बदलानुसार एम. एस्सी. रसायनशास्त्र, इलेक्ट्रॉनिक्स, भौतिकशास्त्र, संख्याशास्त्र, वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, गणित, सूक्ष्मजीवशास्त्र, बायोकेमिस्ट्री, मेडिकल इन्फॉरमेशन मॅनेजमेंट, पर्यावरणशास्त्र, फूड सायन्स, ॲग्रो केमिकल्स अँड पेस्ट मॅनेजमेंट, नॅनो सायन्स, एमसीए सायन्स, भूगोल, रशियन भाषा, एम. एम. मास कम्युनिकेशन, एम. टेक (रूरल टेक्नॉलॉजी), एमबीए (रूरल मॅनेजमेंट), एमएसडब्ल्यू, बी. जे., एम. जे., बी. लिब., बी. एस्सी. एम. एस्सी. इकॉनॉमिक्स इंटिग्रेटेड, एमबीए डिस्टन्स मोड या अभ्यासक्रमांना प्रवेश होतील.

### कागदपत्रे 'अपलोड' करावी लागणार

- गेल्या वर्षीपर्यंत ऑनलाईन अर्ज करून त्यासोबत शैक्षणिक पात्रतेची कागदपत्रे हार्ड कॉपीच्या स्वरूपात विद्यार्थ्यांना विद्यापीठात सादर करावी लागत होती. त्याचा त्रास कमी करण्यासाठी या वर्षीपासून संबंधित कागदपत्रे ऑनलाईन अर्जासमवेत विद्यार्थ्यांनी अपलोड करायची आहेत. प्रत्यक्ष प्रवेशावेळी त्यांनी मूळ कागदपत्रे पडताळणीसाठी सादर करावयाची आहेत.

### अर्ज करण्याची २० एप्रिलपर्यंत मुदत

- प्रवेश परीक्षा विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध केंद्रांवर ऑफलाईन एमसीक्यू स्वरूपात घेतली जाते. यंदा या परीक्षेसाठी अर्ज करण्याची मुदत २० एप्रिलपर्यंत आहे.